!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# शिवसेना संभाजीनगरच्यावतीने रविवार ( ता.२ ) रोजी पर्जन्यवृष्टीसाठी महारुद्राभिषेकांचे आयोजन

**संभाजीनगर : ( ता.३१ )** गेल्या दोन महिन्यापासुन पावसाने दडी मारल्याने, तसेच दुष्काळाचे सावट दूर होण्यासाठी, बळीराजाला सुखी ठेवण्यासाठी रविवार (ता.२) ऑगस्ट रोजी सकाळी ८ ते १२.३० दरम्यान खडकेश्वर महादेव मंदिर येथे पर्जन्यवृष्टीसाठी महारुद्राभिषेकांचे आयोजन करण्यात आले आहे.

वेदशास्त्रसंपन्न श्री कृष्णाकांत महाराज मुळे व ५१ ब्रम्हवृंद पुजा करणार आहे व शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे हे सपत्नीक महापुजेस बसणार आहे. गेल्या दिड महिण्यापासुन पावसाने दडी मारल्यामुळे संभाजीनगर जिल्ल्हासह मराठवाडा दुष्काळाच्या छायेखाली आलेल्या आहे, जुन महिण्यात पडलेल्या पहिल्या पावसात शेतकऱ्यांने पेरणी केली परंतु आता पाऊस नसल्यामुळे पिके करपली आहेत किंवा दुबार पेरणीची परिस्थिती निर्माण झालेली आहे. हे सर्व नैसर्गिक संकट दुर करण्यासाठी पुजा व महारुद्र अभिषेकाव्दारे ईश्वराला साकड घालुन पाऊस पडवा यासाठी प्रार्थना करण्यात येणार आहे.

या पर्जन्यवृष्टीसाठी महारुद्राभिषेकास शिवसेना-युवासेना, सर्व अंगीकृत संघटना, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन उपजिल्हाप्रमुख बंडू ओक यांनी केले आहे.

प्रसिध्दी प्रमुख

गणेश वाघ / मनोज वडगावकर

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400